सकाळ पा. न. 2

# अनधिकृत बांधकामांवर कारवाई

## विरारमध्ये ५० घरे, दुकाने भुईसपाट; भूमाफियांचे धाबे दणाणले

नालासोपारा, ता. ८ (बातमीदार) : भूमाफियांनी महसूल विभागाच्या जागा गिळंकृत करून उभारलेल्या अनधिकृत चाळींवर वसईच्या तहसीलदारांनी आज (ता. ८) धडक कारवाई केली. ५० हून अधिक दुकाने आणि घरे या कारवाईत भुईसपाट करण्यात आली.

विरार पूर्व कण्हेर फाटा या परिसरात आज सकाळी कारवाई सुरू केली. नालेश्वर येथील रहिवाशांकडून कारवाईविरोधात विरार फाटा येथे काही वेळ रास्ता रोको करण्याचा प्रयत्न केला गेला; पण तो पोलिस प्रशासनाने हाणून पाडला. या कारवाईमुळे भूमाफियांचे धाबे दणाणले आहेत; मात्र चाळींतील सर्वसामान्य कुटुंबे रस्त्यावर आल्याने तीव्र संताप व्यक्त होत आहे. कण्हेर परिसरातील महसूल विभागाच्या जमिनी भूमाफियांनी गिळंकृत केल्या होत्या. त्यावर अनधिकृत चाळी उभारून त्या कमी किमतीत सर्वसामान्य नागरिकांना विकल्या होत्या. याबाबत वसईच्या तहसीलदार उज्ज्वला भगत यांच्याकडे अनेक तक्रारी आल्या होत्या. त्यामुळे त्यांनी आज वसई-विरार महापालिका, पोलिस, महावितरण यांना सोबत घेऊन धडक कारवाई केली. या कारवाईत ५० घरे-दुकाने जेसीबीच्या साह्याने भुईसपाट करण्यात आली. परिसरातील सर्व अनधिकृत बांधकामे भुईसपाट होणार नाहीत, तोपर्यंत ही कारवाई अशीच सुरू राहील, असे असे तहसीलदार उज्ज्वला भगत यांनी सांगितले.





विरार : अनधिकृत चाळींवर पोलिस बंदोबस्तात बुधवारी कारवाई करण्यात आली. बाळंतीण महिलेला चिमुकल्याला घेऊन घराबाहेर पडावे लागले.

### बाळंतीण चिमुकल्यासह घराबाहेर

कारवाईमुळे एका नुकत्याच बाळंतीण झालेल्या महिलेला आपल्या चिमुकल्याला घेऊन घराबाहेर पडावे लागले. आपल्या बाळाला घेऊन घराबाहेर पडताना बाळंतीणच्या डोळ्यात अश्रू होते. जेव्हा बांधकामे उभी राहत होती, तेव्हा प्रशासनाने कारवाई केली नाही. आता भूमाफिया गेले आणि आम्ही बेघर झालो, असे भावूक उद्गार तिने काढले.

### अंबरनाथमध्ये जिन्स कारखान्यांवर हातोडा

डोंबिवली, ता. ८ : सर्वोच्च न्यायालय आणि राष्ट्रीय हरित लवाद यांच्या दणक्यानंतर उल्हासनगर शहरातील जिन्स कारखान्यांनी अंबरनाथ ग्रामीण भागात आपले बस्तान हलवले आहे. यापैकी शासकीय जमिनीवर बेकायदा बांधकाम करत उभारण्यात आलेल्या नऊ जिन्स कारखान्यांवर बुधवारी तहसीलदारांनी कारवाई करत अनधिकृत बांधकाम पाडले.

जिन्स वॉशमधून निघणाऱ्या पाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता हे पाणी नदी, नाल्यांत सोडले जात आहे. ते जमिनीत मुरल्याने गावातील बोअर वेलमध्ये येऊ लागले आहे. कुंभार्ली येथील ५ कारखाने, करवले येथील २ कारखाने तसेच उसाटणे व खरड येथील प्रत्येकी १ अशा एकूण ९ कारखान्यांवर कारवाई करण्यात आली आहे. ही मोहीम अशीच सुरू राहील, असे तहसीलदार प्रशांती यांनी सांगितले.

लोकमत पु. पा. न. ४

# वकील, रिक्षा चालकाचा एकमेकांवर चोरीचा गुन्हा

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : रिक्षा अचानक रस्त्यात उभी केल्यावरून वकील आणि रिक्षाचालक यांच्यात झालेला वाद शिवीगाळ, मारहाणीपर्यंत पोहोचला. त्यानंतर दोघांनी एकमेकांविरुद्ध थेट जबरी चोरी केल्याची तक्रार दिल्याने भाईंदर पूर्वेच्या नवघर पोलिसांनी त्यांच्यावर गुन्हे दाखल केले आहेत.

भाईंदर पूर्वेस ओमसाई करिश्मा एन्क्लेव्हमध्ये राहणारे वकील महेशकुमार शुक्ला (२९) हे ६ मार्चच्या रात्री सोनल शर्मा या मैत्रिणीसह इंद्रलोकच्या भाजी मार्केट रस्त्यावरून दुचाकीवरून जात होते. त्यावेळी इंद्रलोक नाका येथे एका रिक्षाचालकाने प्रवासी घेण्यासाठी रस्त्याच्या मधेच रिक्षा थांबवली होती. शुक्ला त्यांना हटकले. त्यावरून दोघांमध्ये वाद झाला. गस्तीवरच्या पोलिसांना हा प्रकार दिसताच शुक्ला व रिक्षा चालक कृष्णकांत प्रजापती (३२, रा. इंद्रलोक) यांना पोलिस ठाण्यात आणले. शुक्ला यांनी प्रजापती याने सोन्याची चेन हिसकावून घेतली. शिवीगाळ आणि मारहाण केल्याचीही तक्रार दिली. तर रिक्षाचालकानेही त्यांच्याविरोधात तक्रार दाखल केली आहे. याप्रकरणी तपास सुरू आहे.

CS CamScanner
Scanned with CamScanner

पुढारी पु. पा. नं. ३

# विरारमध्ये उलगडणार छत्रपती शिवाजींचा इतिहास

**१० मार्च ते १२ मार्चपर्यंत शिवोत्सवाचे आयोजन**

वसई : पुढारी वृत्तसेवा

विरार येथील अमेय क्लासिक क्लबतर्फे दि. १० मार्च ते १२ मार्चदरम्यान शिवोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, त्यामध्ये छत्रपती शिवाजींचा इतिहास उलगडून दाखविण्यात येणार आहे. गडकिल्ल्यांच्या छायाचित्रांसह शिवकालीन शस्त्रे, शिवकालीन राजघराणी व ब्रिटिश भारतीय नाणी यांचे प्रदर्शन या शिवोत्सवामध्ये भरविण्यात येणार असून, याप्रसंगी छत्रपतींनी तानाजी मालुसरे यांच्या देहावर अर्पण केलेली कवड्यांची माळ प्रत्यक्ष पाहता येणार आहे. अशी माहिती अमेय क्लासिक क्लबच्या संचालिका ग्रीष्मा राजीव पाटील यांनी दिली. तसेच सर्व इतिहासप्रेमींनी या उपक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.

अमेय क्लासिक क्लब मध्ये आज शिवोत्सवाची माहिती देण्यासाठी आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ग्रीष्मा पाटील यांच्यासह संदेश जाधव, सनी थेतले आणि मुग्धा लेले यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

दिल्लीच्या तक्ताला आव्हान देणारे हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवराय नेमके कसे दिसत असतील, याबाबत परकीयांना देखील उत्सुकता होती, म्हणून तत्कालीन ज्ञात अज्ञात परकीय चित्रकारांनी ३५० वर्षा पूर्वी छत्रपती शिवरायांची प्रतिमा चित्रबद्ध केली. तीच छत्रपती शिवरायांची अस्सल चित्रे रशिया, जर्मन, लंडन, फ्रान्स, नेदरलँड्स या परकीय देशांमध्ये आज आपणास पहावयास मिळतात. ही दुर्मिळ चित्रे आणि या चित्रांचा प्रदेशांमध्ये जाण्याचा रंजक इतिहास शिवोत्सव २३ यामध्ये इतिहास प्रेमींना पाहता येणार आहे. दिल्लीचा पातशहा हा एकच राजा, अशी त्यावेळी उभ्या हिंदुस्थानामध्ये समजूत होती. पण दिल्लीच्या तक्ताला हादरे देत रयतेचे सार्वभौम सुवर्ण सिंहासन श्रीमद रायगडावर स्थापन करून शिवाजी महाराजांच्या रूपाने मराठा राजा छत्रपती झाला. शिवराज्याभिषेक नामक क्रांतिकारक घटनेची साक्षीदार असलेली छत्रपतींची 'सुवर्ण होन' नाणी आज जगाच्या पाठीवर अत्यंत दुर्मिळ आहेत. शिवोत्सव २३ यामध्ये आपणाला अशी अनेक दुर्मिळ नाणी पाहण्याची संधी मिळणार आहे असे सनी थेतले यांनी सांगितले.

पुण्य नगरी पु. पा. न. १

# पोलीस आयुक्तालयात महिला दिन साजरा

मीरा रोड : मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयात बुधवारी जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला असून जागतिक महिला दिनानिमित्त महिलांसाठी दोन विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला कवी गितेश गजानन शिंदे यांनी महिला या विषयावर कविता केल्या व भारतातील महिलांच्या समस्यांविषयी व्याख्यान व मार्गदर्शन केले. त्यानंतर ग्लोबल विपश्यना फाऊंडेशन संस्थेतील प्रशिक्षित तज्ज्ञांमार्फत आनापान साधनेचा महिलांना लाभ देण्यात आला. पोलीस आयुक्तालयात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाला सर्व वरिष्ठ अधिकारी, त्याचबरोबर महिला पोलीस अधिकारी, अंमलदार, मंत्रालयीन महिला अधिकारी व अंमलदार मोठ्या संख्येने हजर होते.

लोकमत पु. पा. न. १

# कपडे खरेदी करून पैसे न देताच काढला पळ

## महिलेस तरुणीने लावला ५२ हजारांचा चुना

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : कपडे खरेदीच्या बहाण्याने दुकानदार महिलेस तरुणीने ५२ हजार ७०० रुपयांना चुना लावल्याप्रकरणी मीरा रोडच्या नया नगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

शांती नगर सेक्टर १ मध्ये रुबिना चुनावाला यांचे कपड्यांचे दुकान आहे. त्यांच्या दुकानात कपडे खरेदीसाठी आलेल्या तरुणीला रुबिना व कर्मचारी दक्षा यांनी तिला कपडे दाखवले. त्यातून तरुणीने ५२ हजार ३०० रुपयांचे १० कपडे नक्की केले. त्याचवेळी बाहेर असलेल्या इलेक्ट्रिशियन कडून ४०० रुपये घेऊन तिने रिक्षा चालकास दिले. तरुणीने रुबिना यांना त्या इलेक्ट्रिशियनला ४०० रुपये द्या, मी तुम्हाला कपड्याच्या बिलासह देते असे सांगितले. रुबिना यांनी इलेक्ट्रिशियनला ४०० रुपये ऑनलाइन पाठवले. मी समोरच्याच इमारतीत राहते. माझे वडील डॉक्टर आहेत, घरी चला पैसे देते, असे तरुणीने सांगितल्यावर दक्षाही तिच्यासोबत गेली. खालूनच तिसऱ्या मजल्यावर उभ्या असलेल्या बुरखाधारीला तरुणीने हात दाखवला आणि दक्षाला वर जाऊन पैसे घेण्यास सांगितले.

**गुन्हा दाखल**

दक्षा तिसऱ्या मजल्यावर गेली असता, तशी कोणी महिलाच तेथे नसल्याचे समजले. दरम्यान तरुणी कपडे घेऊन पळून गेली होती. नया नगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, वरिष्ठ निरीक्षक जितेंद्र वनकोटी यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

CamScanner
Scanned with CamScanner

सामना पा. न. ६

# शिवसेनेच्या शिवजयंती उत्सवात मिंधे गटाची सुलतानी

## पोलिसांनी दिलेली परवानगी पालिकेने नाकारली

भाईंदर, दि. ८ (सा.वा.) – सरकारी यंत्रणांचा गैरवापर करून शिवसेनेच्या शाखा हडप करणाऱ्या मिंधे गटाने आता शिवसेनेच्या शिवजयंती उत्सवात सुलतानी प्रकार केल्याचे उघडकीस आले आहे. भाईंदर येथील नवघर रोडवरील स्नेहा गल्लीच्या नाक्यावर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने शिवजयंती साजरी केली जाते. यंदाच्या शिवजयंतीसाठी शिवसैनिकांना स्थानिक पोलीस आणि वाहतूक शाखेने परवानगी दिली होती. मात्र मिंधे गटाने हा उत्सव हडप करण्याचा घाट घातला आहे. त्यामुळे शिवसैनिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

नवघर रोडवरील स्नेहा गल्लीच्या नाक्यावर शिवसेनेच्या वतीने शिवजयंती साजरी केली जाते. यंदाही या ठिकाणी येत्या शुक्रवारी शिवजयंती उत्साहात साजरी करण्याची तयारी शिवसैनिकांनी सुरू केली आहे. यंदाच्या कार्यक्रमाला परवानगी मिळावी यासाठी उपजिल्हा संघटक जयलक्ष्मी सावंत आणि उपशहरप्रमुख राजाराम सावंत यांनी काशिमीरा वाहतूक शाखा व नवघर पोलीस आणि महापालिका विभाग कार्यालय यांच्याकडे परवानगीसाठी अर्ज दिले होते. त्यानुसार वाहतूक शाखा आणि स्थानिक पोलीस यांनी शिवजयंती उत्सवासाठी ना-हरकत पत्र दिले. हे पत्र घेऊन शिवसैनिक प्रभाग समिती कार्यालयात पालिकेच्या परवानगी शुल्काची पावती फाडण्यास गेले असता त्यांना शुल्क भरण्याची पावती देण्यास व परवानगी देण्यास नकार देण्यात आला.

### राजकारणाची पातळी घसरली

स्नेहा गल्लीच्या नाक्यावर शिवसेनेच्या माध्यमातून प्रत्येक वर्षी शिवजयंती साजरी केली जाते. यंदा हा उत्सव हाणून पाडण्याचा घाट मिंधे गटाने घातला आहे. पोलीस आणि वाहतूक शाखा यांनी ना-हरकत पत्र दिल्यानंतर पालिकेने कार्यक्रमाची परवानगी देणे आवश्यक होते. मिंधे गटाला हा उत्सव हडप करायचा असल्याने त्यांनी यंत्रणांचा गैरवापर सुरू केला आहे. मिंधे गटाच्या राजकारणाची पातळी घसरली आहे, असा संताप उपजिल्हा संघटक जयलक्ष्मी सावंत यांनी व्यक्त केला आहे.

सामना पा. न. ६

# धुळवड साजरी करण्यासाठी त्यांनी घर सोडले

**तीन अल्पवयीन मुलींना खेड स्थानकात ताब्यात घेतले**

भाईंदर, दि. ८ (सा. वा.) – धुळवड साजरी करण्यासाठी गोव्याला निघालेल्या तीन अल्पवयीन मुलींची काशिमीरा पोलिसांनी कुटुंबीयांशी भेट घडवून आणली. मीरा रोडच्या तीन मुलींनी खेळायला जातो असे सांगून घर सोडले, त्या तिघींनी दादर स्थानक गाठत गोव्याला जाणारी मांडवी एक्स्प्रेस पकडली. रात्र झाली तरी मुली घरी परत न आल्याने नातेवाईकांनी याची तक्रार काशिमीरा पोलिसांना दिली. यातील एका मुलीकडे मोबाईल होता. तिच्या लोकेशनद्वारे पोलिसांनी तपास केला. काशिमीरा पोलिसांनी याची माहिती खेड पोलिसांना दिली. पोलिसांनी खेड स्थानकात धाव घेत मुलींना ताब्यात घेऊन पालकांच्या स्वाधीन केले.

Scanned with CamScanner

लोकमत पा. न. ३

# बागेत खेळायला गेल्या अन् सापडल्या खेडमध्ये

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : उद्यानात खेळता-खेळता उशीर झाल्याने आता आई-वडिलांचा ओरडा खावा लागेल म्हणून तीन अल्पवयीन मुली मीरा रोड- दादर-कल्याण आणि पुन्हा ठाणे असा प्रवास करत मांडवी एक्स्प्रेसने खेडला पोहोचल्या. मोबाइलच्या लोकेशनवरून त्यांचा पत्ता लावून रत्नागिरी जिल्ह्यातील खेड पोलिसांच्या मदतीने रेल्वेस्थानकातून त्यांना ताब्यात घेण्यात आले. बुधवारी सकाळी या तिन्ही मुलींना काशिमीरा पोलिसांनी त्यांच्या पालकांच्या स्वाधीन केले.

११ ते १४ वयोगटातील या मुली मीरा रोडच्या मुन्शी कम्पाउंड-मीरागाव भागात राहतात. एक नववीत, तर दोघी सहावीत शिकत असून मूळच्या त्या नेपाळ, उत्तर प्रदेशातील आहेत. सोमवारी सायंकाळी त्या स्व. वंदना चक्रे उद्यानात खेळायला गेल्या होत्या. त्यांना घरी येण्यास उशीर झाला. आता आपल्याला ओरडा पडेल किंवा आई मार खावा लागेल, या भीतीने तिने दोन्ही मैत्रिणींसोबत पळून जाण्याचे ठरवले. त्यानंतर तिघी बसने मीरा रोड रेल्वेस्थानकात पोहोचल्या. तेथून दादरला पोहोचून त्या कल्याणच्या लोकलमध्ये बसल्या. तेथे पोहोचल्यावर त्यांना घरची ओढ लागली. त्यांनी पुन्हा मीरा रोडला जायचे म्हणून मध्यरात्री ठाणे स्थानक गाठले. सकाळी मीरा रोडला जायचे म्हणून चुकून गोव्याला जाणारी मांडवी एक्स्प्रेस गाडी पकडली. मुली घरी परतल्या नाहीत म्हणून पालकांच्या तक्रारीवरून मंगळवारी काशिमीरा पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल केला. एकाच वेळी तीन अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याने पोलिसही चक्रावून गेले. परिमंडळ १ चे पोलिस उपायुक्त जयंत बजबळे, सहायक पोलिस आयुक्त विलास सानप यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक संदीप कदम, सहायक निरीक्षक टिकाराम थाटकर, उपनिरीक्षक निखिल चव्हाण यांच्या पथकाने विविध भागांतील पोलिसांना माहिती देण्यास सुरुवात केली.

## मोबाइल लोकेशन केले ट्रेस

एका मुलीकडे मोबाइल होता. पोलिसांनी मोबाइलवर संदेश पाठवून मोबाइलचे लोकेशन ट्रेस केले, त्यावरून मुली मांडवी एक्स्प्रेसने जात असल्याचे समजले. पोलिसांनी खेड पोलिसांशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली. त्यानुसार खेड पोलिस व रेल्वे पोलिसांनी तिन्ही मुलींना ताब्यात घेतले.

## तिघी उपाशीपोटी

तिघींकडे पैसे नसल्याने त्यांनी काहीच खाल्ले नव्हते. पोलिसांनी त्यांना जेवण दिले व धीर दिला. काशिमीरा पोलिसांच्या पथकाने त्यांना खेडवरून सुखरूप आणले.

लोकमत पा. न. ३

# डंपरच्या धडकेत दुचाकीस्वार ठार




मीरा रोड : दुचाकीला मागून डंपरने धडक दिल्याने एका दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला असून, याप्रकरणी काशीमीरा पोलिसांनी डंपर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पेल्हारच्या जेनब इमारतीत राहणारे दूध डेअरी व्यावसायिक मोहम्मद इलियास नागोरी (वय २३) हे काशीमीरा भागातील मुंबई-अहमदाबाद महामार्गावरून पेल्हारच्या दिशेने चालले होते. अजित पॅलेस हॉटेलसमोर महामार्गावर मागून भरधाव आलेल्या डंपरने दुचाकीला जबर धडक दिल्याने त्यात नागोरी यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी काशीमीरा पोलिसांनी डंपर चालक शिवा पवार याच्यावर बेदरकारपणे डंपर चालवून दुचाकीस धडक दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

लोकमत पा. न. ३

# भामट्या पोलिसांनी केली फसवणूक




नालासोपारा : दिल्लीच्या भामट्या पोलिसांकडून एकाची फसवणूक केल्याची घटना समोर आली आहे. विरारच्या पाचपायरी येथील एकविरा अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या चंद्रकांत बाबूराव देसाई (५६) हे सोमवारी संध्याकाळी पेल्हार ब्रिज येथून जाताना दुचाकीवरून आलेल्या दोघांनी आम्ही दिल्ली पोलिस असल्याचे सांगत मालाची झडती घेण्याचा बनाव केला. तसेच त्यांच्या बॅगेतील ३५ हजार रुपये काढून ते पसार झाले. दरम्यान, पेल्हार पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

लोकमत पा. न. ३

# गळफास घेऊन आत्महत्या



नालासोपारा : नालासोपारा येथे एका तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. संतोषभुवन येथील ओम जय अंबे चाळीत राहणाऱ्या चंद्रेश हरिनाम सिंह (३०) यांनी सोमवारी सायंकाळी पाचच्या सुमारास राहत्या घरी पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. त्यानंतर त्यांना उपचारासाठी पालिकेच्या विजयनगर येथील रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. तुळींज पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

CamScanner
Scanned with CamScanner

लोकसत्ता पु. पा. न. ४

# वसई–विरारमध्ये ५४ मद्यपींवर कारवाई

## धुळवडीच्या दिवशी मोहीम

लोकसत्ता वार्ताहर



वसई : धुळवडीच्या दिवशी मद्यपान करून वाहने चालविणाऱ्या चालकांविरुद्ध वाहतूक पोलिसांनी वसई-विरारमध्ये विशेष मोहीम राबविली. या वेळी ५४ मद्यपी वाहनचालकांविरुद्ध कारवाई करण्यात आली.

धुळवडीचा आनंद साजरा करीत असताना अनेक जण मद्यपान करून वाहने चालवतात. यामुळे अपघाताच्या घटना घडतात. अशा घटना घडू नयेत, यासाठी वसई-विरार शहरातील वाहतूक विभागाने धुळवडीच्या दिवशी विशेष मोहीम राबवली. त्यात नालासोपारा येथील उड्डाणपुलाच्या खालील बाजूस, सिव्हीक सेंटर, संतोष भुवन, तर वसईतील बाभोळा नाका, रेंज नाका, विरारमधील आर. जे. नाका यासह विविध भागांत कारवाई करण्यात आली. या वेळी पथकांकडून मद्यपी वाहनचालकांवर करडी नजर ठेवण्यात आली.

ब्रीथ ॲनालायझर यंत्राद्वारे चालकांची तपासणी करण्यात आली. वसई वाहतूक विभागाच्या अखत्यारित १४ वाहनचालकांनी मद्यपान केल्याचे आढळून आले, असे पोलीस निरीक्षक सागर इंगोले यांनी सांगितले. तर, विरार वाहतूक विभागाच्या अखत्यारित मद्यपान केलेल्या ४० चालकांविरुद्ध कारवाई केल्याचे साहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल हागवणे यांनी सांगितले.

### पालघरमध्ये सव्वा लाखाचा दंड वसूल

पालघर : धुलिवंदनाच्या दिवशी मंगळवारी पालघरमध्येही वाहतूक शाखेतर्फे कारवाई करण्यात आली. या वेळी वाहनांची तपासणी करून एका दिवसात एक लाख २७ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. या कारवाईत मद्यपान करून वाहन चालवणाऱ्या ३१ चालकांविरुद्ध, दुचाकीवरून ट्रीपल सीट प्रवास करणाऱ्या ३८, तर इतर कलमान्वये २६२ चालकांविरुद्ध दंडात्मक कारवाई केल्याची माहिती वाहतूक शाखेचे प्रभारी अधिकारी असिफ बेग यांनी दिली.

---

लोकसत्ता पा. न. ५

# बच्चू कडू यांना एक वर्षाची शिक्षा

नाशिक : महानगरपालिका आयुक्तांच्या अंगावर धावून जात हात उगारल्याच्या प्रकरणात आमदार तथा प्रहार संघटनेचे प्रमुख बच्चू कडू यांना येथील सत्र न्यायालयाने दोषी ठरवित वेगवेगळ्या कलमांन्वये प्रत्येकी एक वर्षाची शिक्षा सुनावली. अटी-शर्तीसह त्यांना जामीन मंजूर करण्यात आला. कडू हे शासकीय कामकाजात अडथळा आणल्याच्या (३५३) कलमान्वये दोषी ठरले. अपंग बांधवांच्या प्रश्नावर प्रहार संघटनेने महापालिकेच्या प्रवेशद्वारासमोर २०१७ मध्ये आंदोलन केले होते. यावेळी कडू यांनी तत्कालीन मनपा आयुक्त अभिषेक कृष्णा आणि कडू यांच्यात वाद झाले होते. कडू हे आयुक्तांच्या अंगावर धावून गेले होते. कडू यांनी शिवीगाळ करुन हात उगारल्याचे कृष्णा यांनी म्हटले होते.

---

लोकसत्ता पु. पा. न. ४

# दरोड्यातील फरार आरोपीला अटक

वसई : मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील खानिवडे येथे २०१८ मध्ये एका ट्रेलरला लुटून फरार झालेल्या आरोपीला मध्यवर्ती गुन्हे शाखेच्या पथकाने सहा वर्षांनी मध्य प्रदेशातून अटक केली आहे. या आरोपीवर मोक्का अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

साहाय्यक पोलीस निरीक्षक दत्तात्रय सरक यांना आरोपी मध्य प्रदेशातील भिंड जिल्ह्यातील उमरी येथे लपल्याची माहिती मिळाली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल राख यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे त्याचा माग घेऊन त्याला अटक केली.

CS CamScanner

Scanned with CamScanner

म. टा. पु. पा. न. १

# उत्तनमधील डम्पिंगचा मुद्दा पेटणार ?

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**

## ग्रामस्थ आंदोलनाच्या पवित्र्यात

उत्तन डम्पिंग ग्राउंडमुळे स्थानिकांना अनेक वर्षांपासून विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहेत. या समस्या सोडवण्याचे आश्वासन प्रशासनाकडून वेळोवेळी दिले जाते. मात्र, त्याची पूर्तता केली जात नाही, त्यामुळे ग्रामस्थांनी आता आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. या संदर्भात ग्रामस्थांकडून बैठकांचे आयोजन केले जात असून लवकरच पुढील दिशा ठरवली जाणार आहे. त्यामुळे आगामी काळात उत्तन डम्पिंगचा मुद्दा पेटण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मिरा-भाईंदर शहरात दररोज तयार होणाऱ्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी पालिकेने २००८ साली स्थानिक नागरिकांचा विरोध असतानाही उत्तनच्या धावगी डोंगरावर कचरा प्रक्रिया प्रकल्प सुरू केला. हा प्रकल्प त्यानंतरच्या तीन वर्षांतच बंद पडला. या कालावधीत पालिकेकडून प्रक्रिया न करता कचरा प्रकल्पात टाकण्यात आला. त्यामुळे मिश्र स्वरूपातील कचऱ्याचे लाखो घनमीटरचे डोंगर प्रकल्पात तयार झाले आहेत. यातील काही कचऱ्यावर पालिकेकडून प्रक्रिया करण्यात आली असली, तरी उर्वरित कचऱ्याचे ढीग तसेच पडून आहेत.

परिणामी, या कचऱ्यातून पसरणाऱ्या दुर्गंधीचा त्रास स्थानिक रहिवाशांना अनेक वर्षांपासून करावा लागत आहे. येथील कचऱ्याला वारंवार आगी लागत असून, त्यातून पसरणाऱ्या धुराचा त्रासही स्थानिकांना सहन करावा लागत आहे. यामुळे अनेकांना श्वसनाची समस्यादेखील उद्भवत आहे. यासह कचरा प्रकल्पात शहराच्या विविध परिसरातून कचरा घेऊन येणाऱ्या गाड्यांतून पडणाऱ्या लिचडमुळे दुचाकी वाहने घसरून अपघात होण्याच्या घटनाही दिवसागणिक वाढत आहेत.

या समस्या प्रशासनाच्या निदर्शनास आणून देत, त्या सोडवण्यासाठी ग्रामस्थांनी वर्षभरापूर्वी आंदोलनाची हाक दिली होती. त्यानंतर एका बैठकीत ठोस कार्यवाही करण्याचे आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आले. तसेच उत्तन कचरा प्रकल्पावरील ताण कमी करण्यासाठी बायोगॅस प्रकल्प कार्यान्वित करण्याचेदेखील सांगण्यात आले होते. मात्र, त्यावर कोणतीही कार्यवाही मागील काही महिन्यांत करण्यात न आल्याने समस्या कायम असल्याचे मत ग्रामस्थांचे मत आहे. म्हणून ग्रामस्थांकडून आता आंदोलनाचा पवित्रा घेण्यात आला आहे. मागील काही दिवसांपासून गावात बैठकांचे आयोजन केले जात आहे. लवकरच आंदोलनासंदर्भातील प्रशासकीय यंत्रणांसोबत पत्रव्यवहार करत, पुढील भूमिका ग्रामस्थांकडून घेतली जाण्याची शक्यता वर्तवली जाते.

लोकसत्ता पु. पा. न. ४

# घरफोडी करणारी पाच जणांची टोळी जेरबंद

## ११ गुन्हे उघड; सहा लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**लोकसत्ता वार्ताहर**

गुन्हे वृत्त

**वसई :** घरफोडी करणाऱ्या पाच जणांच्या टोळीला वालीव पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने अटक केली आहे. आरोपींकडून पाच लाख ९२ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला असून, ११ गुन्हे उघडकीस आणले आहेत.

वसई-विरारमध्ये सोनसाखळी चोरी, घरफोडी यांसारखे प्रकार वारंवार घडत असल्याचे उघडकीस येत आहे. काही महिन्यांपूर्वी वसई पूर्वेतील चिंचोटी परिसरातील एका मोबाइल दुरुस्तीच्या दुकानात चोरी झाली होती. याप्रकरणी वालीव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याची गंभीर दखल घेत गुन्हे प्रकटीकरण शाखेने याचा तपास सुरू केला होता. त्या दरम्यान मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी राजेशकुमार ठाकूर (२८), राज सिंग (२५), रकिऊल शेख (२४), शाम राठोड (४०) आणि फकरू शेख (४७) यांना अटक केली आहे. या आरोपींकडून पाच लाख ९२ हजार ३०० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. याशिवाय पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या ११ गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले आहे.

वरिष्ठ पोलीस उपायुक्त सुहास बावचे, साहाय्यक पोलीस आयुक्त शशिकांत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली वालीवचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास बर्वे, पोलीस निरीक्षक मिलिंद साबळे, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे ज्ञानेश फडतरे यांनी ही कारवाई केली.

लोकसत्ता पु. पा. न. ४

# कौटुंबिक वादातून महिलेला जाळले

**वसई :** कौटुंबिक वादातून एका पतीने आपल्या पत्नीवर रॉकेल ओतून तिला जाळण्याचा प्रयत्न केल्याची घटना नालासोपारा येथे घडली आहे. या घटनेत महिला ७० टक्के भाजली असून तिच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिसांनी महिलेच्या पतीला हत्येच्या प्रयत्नात अटक केली आहे.

नालासोपारा पूर्वेच्या प्रगतीनगरमधील शुभम अपार्टमेंटमध्ये अनिता पांचाळ (३७) ही पती संतोष याच्यासह राहते. अनिता हिला पहिल्या पतीपासून तीन मुले आहेत. पती-पत्नींमध्ये कौटुंबिक वाद होता. मंगळवारी सायंकाळी त्यांच्यात वाद झाला असता संतोष याने तिच्यावर रॉकेल ओतून पेटवून दिले. ही बाब लक्षात येताच शेजाऱ्यांनी अनिता हिला रुग्णालयात दाखल केले. त्यात ती ७० टक्के भाजली आहे. तिला पुढील उपचारासाठी मुंबईच्या जे. जे. रुग्णालयात दाखल केले आहे. तिची प्रकृती गंभीर आहे.

याप्रकरणी आम्ही आरोपी संतोष पांचाळ याच्यावर हत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून अटक केल्याची माहिती तुळिंज पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेंद्र नगरकर यांनी दिली.

CS CamScanner

Scanned with CamScanner

# Three runaway minor girls found in train to Goa within 6 hrs

## Didn't return home from park for fear of being scolded for staying out late; boarded Mandovi Express; traced as train reached Khed

SURESH GOLANI
MIRA-BHAYANDAR

Six hours after they mysteriously disappeared while playing in a municipal garden in Kashimira, three minor girls were traced and rescued by the police from a train headed to Goa on Wednesday.

The girls had gone to play in the garden and were to return by 7pm. When they failed to return till late in the evening, their parents launched a futile search, following which a complaint was registered at the Kashimira police station. The police later found out that the girls ran away for fear of being reprimanded for staying out late.

An offence under section 363 for kidnap (since the girls are minors aged 11, 13 and 14) was registered against unidentified people. Fearing abduction or even human trafficking, a team led by Senior Police Inspector Sandip Kadam, under the supervision of Deputy Commissioner of Police Jayant Bajbale, went into an overdrive to track the girls.

The police circulated their photographs to all police stations and also posted them on social media platforms, including WhatsApp. However, the only clue the police had was a mobile number belonging to the father of one of the girls which she had apparently carried along.

Investigations revealed that the girls had reached Thane railway station via Dadar and Kalyan. The police were not sure about the mobile number, which was switched off, but they continued keeping a watch. "Finally, the number turned active. We started tracking it and found that it was moving towards Ratnagiri from Panvel. We started matching the movement with the timetables of trains on the route and zeroed in on the Mandovi Express." said Kadam.

**Cops have contacted the child welfare committee**

The police team contacted their Khed counterparts and provided photographs of the girls. The Khed police found the girls and safely handed them over to the Kashimira police.

"We have contacted the child welfare committee and after completing the formalities the custody of the girls will be given to their parents," said an official.

Scanned with CamScanner

CMYK

MHT

# मुंबई हिंदमाता टाइम्स

राष्ट्रीय हिन्दी दैनिक

मुंबई, गुरुवार 09 मार्च 2023

संपादक : विजय आर. सिंह | RNI No. MAHHIN/2006/20347

मुंबई हिंदमाता टाईम्स
आवश्यकता है
9867 314 765

आज का पंचांग | सूर्योदय / सूर्यास्त | आज का मौसम | तापमान | शेयर बाजार | सर्राफा बाजार

6.20am 6.10pm

अधिकतम 36℃ न्यूनतम 25℃

NSE

# वसई में लाखों रुपये माल के साथ 5 चोर गिरफ्तार

## 11 मामलो का खुलासा, 5 लाख रुपए का माल बरामद



**वसई ;** चोरी व घरफोडी करने वाले 5 शातिर चोरो को वालीव पुलिस स्टेशन की क्राइम डिटेक्शन टीम ने पकड़ने में बडी सफलता प्राप्त की है। इनके पास से कुल 11 अपराधों (चोरी ) की गुत्थी सुलझा ली है। मामले में 5 लाख से ज्यादा का माल जप्त कर आगे की विवेचना कर रही है। यह कार्रवाई परिमंडल 3 डीसीपी सुहास बावचे व एसीपी शशिकांत भोसले के आदेशानुसार में वालीव थाने के पीआई कैलाश बर्वे,क्राइम पीआई मिलींद साबले के मार्गदर्शन व एपीआई ज्ञानेश फडतरे की टीम ने की है।

पुलिस अधिकारी ने यह जानकारी बुधवार को दी है। पुलिस ने बताया कि 27 जनवरी 2022 को लाईनपाडा,चिचोटी स्थित मोबाइल रिपेयरिंग की दुकान से मोबाइल फोन व नकदी चोरी हो गया था,इस संबंध में शिकायतकर्ता सुमित प्रदीप वेखंडे ने वालीव थाने में अज्ञात चोर के ऊपर एफआईआर दर्ज करवाया था। पुलिस ने कहा कि,उक्त अपराध की जांच के तहत मुखबिर से मिली जानकारी और तकनीकी विश्लेषण के आधार पर वालीव थाने के क्राइम डिटेक्शन टीम के अधिकारियों व कर्मचारियों ने अन्य आरोपियों के साथ ही ऑन रिकॉर्ड अपराध की जांच की,और राजेशकुमार देवेंद्र ठाकुर (28),राज राधेश्याम सिंह (25),रकीऊल मन्दु शेख (24),श्याम उत्तम राठोड (40) व फकरु मोहम्मद अली शेख (47) को हिरासत में लिया, हिरासत में लिए जाने के बाद उसने एक अपराध किया था, चोरी का मोबाइल फोन,नकदी और वालीव पुलिस स्टेशन के रिकॉर्ड में कुल 11 अपराधो का खुलासा हुआ,इन लोगो के पास कुल 5,12,300 रुपये का माल जप्त किया गया।

Scanned with CamScanner

लोकमत

राज्यातील अन्य चार जणींचा समावेश

# वसईकर हर्षाली करणार दोन शिखरांवर चढाई

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** ८ मार्चला दरवर्षी जागतिक महिला दिन साजरा केला जातो. महिलांच्या सन्मानाचा, त्यांच्या उत्कर्षाचा दिवस म्हणजे महिला दिन. प्रत्येक क्षेत्रात आज महिला पुरुषांच्या बरोबरीने कार्यरत असून, आपल्या कर्तृत्वाने त्यांनी विविध क्षेत्रांत गगनभरारीही घेतली आहे. महिला दिनानिमित्त महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या पाच हिरकणींनी हिमालयातील दोन शिखरे पादाक्रांत करण्याचा निर्धार केला असून यात वसईकर हर्षाली वर्तक हिचा समावेश आहे. या मोहिमेत मनीषा वाघमारे (औरंगाबाद), प्राजक्ता घोडे (मुंबई), गौतमी देशपांडे (मुंबई) व श्वेता मोरे (ठाणे) यांचाही सहभाग असणार आहे.

महाराष्ट्रातील पाच महिला गिर्यारोहक जुलै २०२३ मध्ये हिमालयातील स्पिटी व्हॅलीमधील समुद्रसपाटीपासून ६००० मीटर उंचावरील दोन शिखरे सर करणार आहेत. माऊंट दावा कांग्री (उंची ६ हजार १४० मीटर) व माऊंट लाग वरचे (उंची ६ हजार मीटर) अशी या दोन शिखरांची नावे आहे. या मराठमोळ्या हिरकणी कोणाचीही मदत किंवा वाटाड्या, शेर्पा यांना सोबत न घेता मोहिमेवर निघणार आहेत.



## साहसी मोहिमेत सहभाग घेणाऱ्या तरुणी

- **मनीषा वाघमारे :** जगातील सर्वात उंच शिखर एव्हरेस्ट सर करणारी मराठवाड्यातील पहिली महिला गिर्यारोहक. सह्याद्री आणि हिमालयातील साधारण दीड दशकाचा अनुभव असून या मोहिमेचे नेतृत्व करणार आहे.
- **हर्षाली वर्तक :** वसईची गिरीकन्या म्हणून प्रचलित असलेली. देश-विदेशात झेंडा रोवून आलेली तसेच अनेक मोहिमेचे प्रतिनिधित्व केलेली. साधारण दीड दशकाचा अनुभव असलेली एक उत्तम गिर्यारोहिका.
- **प्राजक्ता घोडे :** स्पोर्ट्स क्लाईंबिंगमध्ये उत्कृष्ट कार्य करणारी तसेच या क्षेत्राला पुढे नेण्यासाठी मेहनत करणारी, महाराष्ट्रातील अनेक सुळके हिने लीलया सर केले आहेत. तसेच एक दशकाचा अनुभव आहे.
- **श्वेता मोरे :** वयाने सर्वात लहान परंतु सह्याद्री आणि हिमालयामध्ये फिरून स्वतःची वेगळी ओळख तयार केलेली. हिचाही या टिममध्ये समावेश आहे.
- **गौतमी देशपांडे :** सह्याद्रीसोबत हिमालयातही वावर आहे. हिमालयात एकटे फिरण्याचा अनुभव असलेली, एक दशकाचा गिर्यारोहणातील अनुभव असलेली.



Scanned with CamScanner